

# आज 'साय-फाय फेस्ट'

**पुणे :** 'क्विक हील'तर्फे महाराष्ट्र सायबर आणि विश्वकर्मा विद्यापीठाच्या सहकार्याने 'साय-फाय आर्ट्स फेस्टिव्हल २०१९'चे आयोजन करण्यात आले आहे. विश्वकर्मा विद्यापीठाच्या पुण्यातील कॅम्पसमध्ये १६ नोव्हेंबरला हा महोत्सव भरविण्यात येणार आहे. राष्ट्रीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेचे माजी अधिष्ठाता प्रा. समर नखाते या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.